# दोन सूर्य असलेल्या नव्या ग्रहाचा शोध!

**वॉशिंग्टन, १६ सप्टेंबर/ एएफपी**

अमेरिकी खगोलशास्त्रज्ञांनी दोन सूर्य असलेला पहिलाच ग्रह शोधून काढल्याचा दावा केला आहे. आहे. 'केप्लर-१६ बी' या नावाने त्यांनी संबोधलेल्या या नव्या ग्रहावर गोठवून टाकणारे थंड हवामान असून त्याचे आकारमान शनि ग्रहाएवढे आहे. या ग्रहाच्या भोवती सुमारे २०० प्रकाशवर्षे दूर अंतरावर शनिसारखेच कडे आहे. त्यामुळे तीस वर्षांपूर्वी गाजलेल्या 'स्टार वॉर्स' या चित्रपटात दाखविलेली काल्पनिक बाब आता वास्तवात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

अमेरिकन अंतराळ शोध संस्थेच्या केप्लर स्पेस टेलिस्कोपद्वारा सध्या १ लाख ५५ हजार ताऱ्यांच्या तेजस्वितेचे निरीक्षण सुरू आहे, अशी माहिती वैज्ञानिक नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाली आहे.

या ग्रहाचा शोध सर्वांनाच अचंबित करणारा आहे. विज्ञानाच्या काल्पनिकतेत जे शोधण्याचा प्रयत्न



केला जातो तेच मूर्त स्वरुपात आल्याची अनुभूती आल्याचे या नियतकालिकाचे निबंधाचे सहलेखक ॲलन बॉस यांनी म्हटले आहे. दोन सूर्य असलेला 'केप्लर-१६ बी' हा पहिलाच ग्रह असल्याचे निःसंदिग्धपणे सिद्ध झाले असल्याचे हॉवर्ड स्मिथसोनियन या ॲस्ट्रॉफिजिक्स सेंटरच्या जोश कार्टर यांनीही म्हटले आहे.

या नव्या ग्रहाच्या शोधामुळे निसर्गाने निर्माण केलेल्या आपल्या सूर्यमालेत विविध प्रकारचे ग्रह, तारे असल्याचे सिद्ध झाल्याने अशी सूर्यमाला हे एकमेव उदाहरण आहे. ■